खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### आझादी का अमृतमहोत्सव – रासेयो

पुढारी

# राजगुरुनगर येथे 'आझादी का अमृत महोत्सव'

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्त 'आझादी का अमृत महोत्सव' हा कार्यक्रम केंद्र व राज्य सरकार २०२३ पर्यंत विविध उपक्रमांनी साजरा करणार आहे. राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू जन्मस्थळी शुक्रवारी (दि. १३) या कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.

केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी १३ ऑगस्ट ते २ ऑक्टोबर २०२१ पर्यंत देशातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील सर्व विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये विविध देशभक्तीपर उपक्रम राबविण्याचे परिपत्रक जारी केले आहे. त्याला अनुसरून हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व सर सेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालय यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या



**हुतात्मा राजगुरू यांच्या जन्मस्थळी अभिवादन करताना कार्यकर्ते.**

वेळी हुतात्मा राजगुरू यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. मधुकर गिलबिले यांचे व्याख्यान झाले. विधी महाविद्यालय कार्यक्रम अधिकारी प्रा. नीलिमा पाटील व हुतात्मा राजगुरू महाविद्यालय कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश धुमाळ, नेहरू युवा केंद्र पुणे जिल्हा समन्वयक बजरंग बोरकर या वेळी उपस्थित होते.

My Gramin Edition
Aug 14, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव राजगुरूंच्या जन्मस्थळी सुरू

**राजगुरूनगर, दि. १३ (प्रतिनिधी)** - स्वातंत्र्याच्या ७५ व्या अमृत महोत्सवाची सुरुवात येथील हुतात्मा राजगुरू राष्ट्रीय जन्मस्थळ स्मारकात करण्यात झाली. त्यानिमित्ताने करोना नियमांची अंमलबजावणी करून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. येथील विधी महाविद्यालय व हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्रत्येकी ७ मुले आणि १३ मुली अशा ४० स्वयंसेवकांनी आज (शुक्रवारी) हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या जन्मस्थळी भेट दिली.



**राजगुरूनगर : येथील हुतात्मा राजगुरू राष्ट्रीय जन्मस्थळ स्मारकामध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाची सुरुवात करण्यात आली.**

हुतात्मा राजगुरू शिक्षण प्रसारक मंडळाचे सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना एकक आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर यांच्या वतीने हुतात्मा राजगुरू राष्ट्रीय जन्मस्थळ स्मारकात ४० स्वयंसेवकांनी भेट देऊन मानवंदना दिली. केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण मंत्रालय दिल्ली यांनी १३ ऑगस्ट ते २ ऑक्टोबर या कालावधीत देशातील सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशामध्ये येणाऱ्या सर्व विद्यापीठांमध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्ताने देशभक्तीपर विविध कार्यक्रम आयोजित करण्याचे परिपत्रक काढले आहे. त्यानुसार येथील हुतात्मा राजगुरु राष्ट्रीय जन्मस्थळ स्मारकात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे व हुतात्मा राजगुरूंचे योगदान या विषयावर मधुकर गिलबिले गुरुजी यांनी विद्यार्थ्यांना प्रबोधन केले. हुतात्मा राजगुरू यांचे बालपण ते क्रांतीकारकाच्या भूमिकेतील पदार्पण याबाबत माहिती दिली. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश धुमाळ यांनी फिट इंडिया फ्रीडम रन २.० ची प्रास्ताविक माहिती मुलांना समजून सांगितली. फिट इंडिया फ्रीडम रन २.० यांची विद्यार्थी स्वयंसेवकांकडून शपथ घेण्यात आली.हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक सहभागी होते. प्रास्ताविक प्रा. नीलिमा फोकमारे यांनी केले.

प्रभात Sat, 14 August 2021
https://epaper.eprabhat.net/c/62460885



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू यांच्या जन्मस्थळी 'आझादी का अमृत महोत्सव' या कार्यक्रमाचा प्रारंभ करताना मान्यवर.

# हुतात्मा राजगुरूंच्या जन्मस्थळी 'आझादी का अमृत महोत्सव'

**राजगुरुनगर, ता. १७ :** हुतात्मा राजगुरू यांच्या येथील जन्मस्थळी हुतात्मा राजगुरूंना मानवंदना देऊन 'आझादी का अमृत महोत्सव' या कार्यक्रमाचा प्रारंभ शुक्रवारी झाला.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालय यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विधी महाविद्यालय कार्यक्रम अधिकारी प्रा. नीलिमा फोकमारे व हुतात्मा राजगुरू महाविद्यालय कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश धुमाळ यांच्या नियोजनाने दोन्ही महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या उपस्थितीत हा सोहळा झाला. या कार्यक्रमाचा प्रारंभ हुतात्मा राजगुरू यांच्या प्रतिमेस अभिवादन करून झाला. या वेळी मधुकर गिलबिले गुरुजी यांचे व्याख्यान झाले. या वेळी बजरंग बोरकर, राजाराम गरुड आदी उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख